# कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

## पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

कार्यालय : 0712-2680280, 2680877

E-mail : apmcnagpur@rediffmail.com, Website : www.apmcnagpur.com

श्री/श्रीमती ______________________________ यांस,

स.न.वि.वि.

आपणांस कळविण्यांत येते की, समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक १२/०९/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजतां आयोजीत केलेली आहे. सदर सभेसाठी आपणांस आमंत्रीत करण्यात येत आहे. तरी आपण सभेला उपस्थित राहावे, ही विनंती.

स्थळ :– संत्रा व फळे लिलाव दालन क्र.०४ पं. जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड, कळमना, नागपूर.

आपला

अहमदभाई करीमभाई शेख
सभापती

# कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

**पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५**

-----

## विनम्र श्रध्दांजली

अहवाल वर्षात जे देशभक्त, स्वातंत्र्य सेनानी, थोरनेते, लेखक संशोधक, कवी, साहित्यीक, कलावंत, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, खेळाडु, सामाजिक व सहकारी कायकर्ते, संस्थेचे आजी माजी संचालक सभासद व हितचिंतक ग्राहक सेवक, कर्मचारी दिवंगत झाले त्या सर्वाच्या कुटुंबियांचे दु:खात सहभागी असुन दिवंगतांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करित आहोत. त्यांच्या आत्म्यास चिर:शांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

ओम शांती.. शांती...



# कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

## पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महोदय,

आपणांस कळविण्यांत येते की, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक १२/०९/२०२४ ला दुपारी १.०० वाजतां पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, कळमना, नागपूर येथील संत्रा व फळे लिलाव दालन क्र.४ मध्ये आयोजीत केलेली आहे. सभेसमोरील विषयांची सूची खालील प्रमाणे दिलेली आहे. तरी आपण सभेला उपस्थित राहावे, ही विनंती.

### सभेची विषय सूची

<u>विषय क्र.१</u> :— सन २०२१—२२ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

<u>विषय क्र.२</u> :— संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२३—२४ चा वार्षिक अहवालाची माहिती देणे.

<u>विषय क्र.३</u> :— सन २०२३—२४ च्या ताळेबंद पत्रकाची माहिती देणे.

<u>विषय क्र.४</u> :— सन २०२४—२५ चे आर्थिक अंदाजपत्रक माहितीस्तव सादर.

<u>विषय क्र.५</u> :— मा. विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) सहकारी संस्था, नागपूर यांनी सादर केलेला वर्ष २०२२—२३ च्या लेखा परिक्षणाचा अहवाल माहितीस्तव सादर.

नागपूर
दिनांक : ०९/०९/२०२४

एन.पी. यगलेवाड
अपर निबंधक तथा सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

<u>टिप</u> :— १. आमसभेस येतांना पत्राची प्रत सोबत आणावी.
२. सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यांस ते प्रश्न समितीचे कार्यालयांत दि. ०९/०९/२०२४ पर्यत मिळतील, अश्यारितीने पाठवावे.

एन.पी. यगलेवाड
अपर निबंधक तथा सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

विषय क्र.१ :– सन २०२१–२२ चें वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

कार्यालय,नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर
पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड,नागपूर–३५

---

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २३.०९.२०२२ रोजी दुपारी १.०० वाजतां बाजार समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड वरील संत्रा लिलाव दालन क्रमांक ४ मध्ये बाजार समितीचे सभापती मा.श्री.अहमदभाई करीमभाई शेख यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

| | |
|---|---|
| सदर सभेला नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच | ६८ |
| त्याचप्रमाणे नागपूर सेवा सहकारी संस्था अध्यक्ष | ५६ |

सभेला उपस्थित होते.

| | |
|---|---|
| अडते/व्यापारी/प्रतिनिधी | एकूण ७५ |
| हमाल पतिनिधी | एकूण १२ |

सभेला उपस्थित होते.

तसेच मंचकावर समितीचे सर्व संचालक मंडळ, सचिव व इतर अधिकारी उपस्थित होते सभेचे संचालन कृषि उत्पन्न बाजार समितीचे वतीने सौ.विजयाताई वैद्य यांनी केले. त्यानंतर समितीचे सभापती मा. श्री.अहमदभाई करीमभाई शेख यांनी प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी अहवालाचे वाचन केले त्यात समितीने केलेल्या कामाची व समितीचे पुढील उपक्रमाबाबत माहिती दिली. व त्यानंतर विषय पत्रिकेवरील एकेका विषयावर सविस्तर चर्चा करून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**विषय क्र.१ :–** मागील वर्ष सन २०२१–२२चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

**ठराव क्र.१ :–** मागील सन २०२१–२२ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताचे प्रती उपस्थित सदस्यांना देण्यांत आली. त्यास उपस्थित सभासदांनी मंजूरी प्रदान केली.

ठराव सर्वानुमते मंजुर

**विषय क्र.२ :–** संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२१–२२ चा वार्षिक अहवाला ची माहिती देणे.

**ठराव क्र.२ :–** मा.सभापती महोदयांनी सन २०२१–२२ चा वार्षिक अहवाल सभेपूढे वाचून दाखविला व याबाबत सभेला बाजार समितीतील पुढील उपक्रमाबाबत सविस्तर माहिती देण्यांत आली ती पुढील प्रमाणे आहे.

**बाजार समितीतील पुढिल उपक्रम :–**

माती परिक्षण :– बाजार समिती क्षेत्रातील २११ गावातील शेतकऱ्यांचे शेतातील मातीचे नमुने घेवुन शेतकऱ्यांच्या सभा बोलावीने व त्यांना माती परिक्षणाचे महत्व पटवून देणे. तसेच तंत्रज्ञानाप्रमाणे शेती करण्यासाठी प्रवृत्त करणे व शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्य पत्रिका वितरीत करणे इत्यादी उपक्रम बाजार समितीचे स्वनिधीतून राबविण्यांत आले.

**बांधकाम व जमिनी विषयी माहिती उपक्रम :—**

बाजार समितीचे पं. जवाहरलाल नेहरू बाजार आवार मौजा चिखली देवस्थान येथील समितीकडे १४० एकर जागा असून बाजार आवार विकास विस्ताराकरीता लगतची खसरा क्रमांक ९४ मधील ९.५६ एकर व खसरा क्र. ११४/१ मधील १.७२ एकर व खसरा क्र.११४/२—३ख मधील १.६२ एकर जागा संपादनाच्या कार्यवाहीस ही सभा मंजुरी देत आहे.

न्यु.कॉटन मार्केट यार्ड गणेशपेठ येथे ३ एकर जागेत अद्यावत आंतरराष्ट्रीय दर्जाचे वातानुकुलीत फूल मार्केट उभारणेकरीता प्रस्ताव आहे.

बाजार समितीचे उपबाजार बुटीबोरी येथे धान्य बाजार सुरू करणेकरीता धान्य खळे, गोदाम व व्यावसायीक संकुल, बाजार आवार विकास रोड व ईतर सुविधा निर्माण करणेचे प्रस्तावीत आहे. ख.क्र.१२८ येथे बाजार आवार विकसीत करणेचे काम लवकरच सुरू होत आहे व तेथे ऑक्शन हॉल, व्यापारी संकुले, शेतकरी प्रशिक्षण गृह बांधण्याचे प्रस्तावीत आहे.

समितीचे न्यु ग्रेन मार्केट एरिया मध्ये ७२ गाळे बांधून झालेले आहे तसेच पुन्हा ४८ गाळयांचे बांधकाम सुरू असुन न्यु ग्रेन मार्केट मध्ये कॅनव्हासींग एजंट करीता १६० खोल्यांचे बांधकाम सुरू आहे.

समितीचे धान्य बाजार मध्ये ५५०० स्के.मिटर कॉक्रीट रोडचे बांधकाम तसेच संत्रा व फळेबाजार मध्ये ३०००० स्केअर मिटर रोडचे बांधकाम सुरू आहे.

भाजी बाजारातील १४६ गाळयांचे बांधकाम सुरू असून लवकरच पूर्ण करण्यांत येईल.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मधील संपूर्ण डांबरीकरण रोडचे नुतनीकरण करण्याकरीता रू.१४ कोटी चे प्रकरण मा. पणन संचालक महा. राज्य पूणे यांचेकडे मंजुरीकरीता पाठविण्यात आले आहे.

समितीचे पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड कळमना येथे अद्यावत पाणी पुरवठा करण्याकरीता गादा ते कळमना मार्केट यार्ड पर्यंत नविन डी.आय. पाईप लाईन टाकण्यात येत आहे.

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मधील संपूर्ण घन कचरा जमा करून बायो सिएनजी गॅस तयार करण्याचा प्रकल्प प्रस्तावीत आहे.

**विद्युत व पाणी विभाग विषयी माहिती उपक्रम :—**

समितीचे मार्केट यार्डमध्ये विजेचे व्यवस्था सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने ग्रीड केबल नेटवर्कच्या नुतनीकरणाचे काम झालेले आहे. तसेच मुख्य रस्त्यावरील लाईट्स, लिलाव दालनाचे लाईट्स सोलर किंवा एलईडी व्दारे प्रचलीत पध्दतीनुसार करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

गादा पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाईप लाईन नुतनीकरणाचे काम महाराष्ट्र जिवन प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांचेकडून लवकरच राबविण्यांत येणार आहे. यावर सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन सन २०२१—२२ च्या वार्षिक अहवालास एकमताने मंजुरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्र.३:—** सन २०२१—२२ चे ताळेबंद पत्रक माहितीस्तव सादर.

**ठराव क्र.३:—** सन २०२१—२२ चे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक सभेपूढे सादर करून वाचून दाखविले व त्यातील मुख्य शिर्षकाबाबत सभेला सविस्तर माहिती देवून सन २०२१—२२ चे आर्थिक पत्रकांना मंजुरी देणेबाबत सन्माननीय सदस्यांना विनंती केली. त्यावर संक्षीप्त चर्चा होवून सन २०२१—२२ चे आर्थिक अंदाजपत्रक/ताळेबंद पत्रकांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्र.४:—** सन २०२२—२३ चे आर्थिक अंदाजपत्रक माहितीस्तव सादर,

**ठराव क्र.४:—** मा.सभापती महोदयांनी सन २०२२—२३ चे आर्थिक अंदाजपत्रक सभेपूढे सादर करून वाचून दाखविले. यातील उत्पन्न व खर्चाच्या मुख्य शिर्षाबाबत सभेला सविस्तर माहिती देवून सन २०२२—२३ च्या अर्थसंकल्पास मंजुरी देणेबाबत सन्माननिय सदस्य/सभासदांना विनंती केली.

यावर सक्षीप्त चर्चा होवून अर्थसंकल्प यथायोग्य असल्याची खात्री झाल्याने सन्माननिय सभासद/सदस्यांनी यास एकमताने मंजुरी दिली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

**विषय क्र.५:—** लेखा परिक्षकाने लेखा परिक्षण केलेले लेख्याचे ज्ञापन माहितीस्तव सादर.

**ठराव क्र.५:—** मा. सभापती यांनी विषयाचे वाचन करून मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग २ सहकारी संस्था (ग्राहक)नागपूर यांनी सादर केलेला सन २०२१—२२ चा कार्यालयाकडे सादर केलेला लेखा परिक्षण अहवाल सभेपूढे सादर करण्यांत आला व सदर लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेऊन त्यास मान्यता देणेबाबत सन्माननिय सदस्य/सभासदांना विनंती केली.

त्यावर संक्षीप्त चर्चा होवून सदर तपासणी अहवालात कोणतेही गंभीर आक्षेप नसल्यामुळे त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

ठराव सर्वानुमते मंजुर.

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय/आक्षेप चर्चेला न आल्यामुळे सभेची कार्यवाही शांततामय वातावरणात चालविण्यास सहकार्य केल्याबद्दल मा. सभापती यांनी सभेला उपस्थित सन्माननीय समिती सदस्य व सभासदांचे पुन:श्य आभार मानुन सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले व यानंतर ही सभा संपली.

| | |
|---|---|
| आर.एम. भुसारी | अहमदभाई करिमभाई शेख |
| अपर निबंधक तथा सचिव | सभापती |

कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

**विषय क्र.२: संचालक मंडळाचे वतीने सादर केलेला सन २०२३—२४ चा वार्षिक अहवालाची माहिती देणे.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल

सन्माननीय बंधु—भगिनिंनो,

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणा सर्वांचे मी मन:पुर्वक स्वागत करतो..

नागपूर जिल्ह्यातील अग्रणी ठरलेली बाजार समिती दिनांक १६ नोव्हेंबर १९७४ ला महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी—विक्री (नियमन) अधिनियम १९६३ नुसार स्थापन झालेली असून हया बाजार समितीने ४९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. शेतकऱ्यांकरीता सर्व सोयींनीयुक्त एक कार्यक्षम बाजार समिती म्हणून आपली प्रतिमा निर्माण करण्यांस समितीला यश मिळालेले आहे. हया पार्श्वभूमीवर समितीचा वर्ष २०२३—२४ चा वार्षिक अहवाल सादर करतांना आनंद वाटतो.

समितीचे कार्यक्षेत्रे नागपूर ग्रामीण तालुक्याकरीता असून एकूण २११ गावांचा त्यात समावेश आहे. पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्डावर धान्य, नविन धान्य, मिरची, संत्रा व फळे, कांदा—बटाटा, भाजी बाजार आणि गुरांचा व बकरा बाजार भरतो. तसेच बुटीबोरी येथे कापूस बाजार, हे उपबाजार अधिसुचित आहेत.

समितीने नियमनांखाली तांदूळ, गहू, ज्वारी, तूर, मुंग, चना, उळीद, डाळी, बाजरा, सोयाबीन, जवस, तिळ, भुईमुंग शेगां, एरंडी, अंबाडी, धान, कापूस, मिरची, चिंच, सरकी, संत्रा, आंबा, मोसंबी, केळी, सेब, द्राक्षे, व इतर फळे, कांदा—बटाटे, लसून, अद्रक सुरण, टोमॅटो, कोकम, कंद, कोयरा, पालेभाज्या, सर्व प्रकारच्या भाजीचा प्रकार, हळद, दुधाळू जनावरे, बकरी, मेंढया, गवत, कडबी, चारा व फुले अधिसूचीत केली असून सर्व मुख्य व उपबाजारांत नियमीत सर्व शेतमाल खरेदी—विक्रीचे व्यवहार होतात.

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती सन १९७४ मध्ये महाराष्ट्र कृषि उत्पन्न विपणन कायदा १९६३ अन्वये प्रस्थापित झाला. त्याआधी व नंतरही नागपूर शहरात धान्य उपबाजार,न्यु ग्रेन उपबाजार, संत्रा फळे उपबाजार, आलु—कांदा उपबाजार,भाजी बाजार, मिरची व गुरे उपबाजार, बकरा बाजार वेगवेगळया ठिकाणी महानगरपालिकेच्या जागेत भरत होते. नागपूर महानगर पालीकेच्या जागेवर असलेले हे बाजार अत्यंत अडचणीचे होते. त्या ठिकाणी स्थाई स्वरुपाच्या सोयी उपलब्ध करुन देणे शक्य नव्हते. रहदारीकरीता अपूरे रस्ते, शेतकऱ्यांचा माल ठेवण्याकरीता अपूरी जागा, शेतमालाचे आवागमनांत सतत येणारे अडथळे, वाहतुक कोंडी आवार असल्याशिवाय हया सोयी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही असा विचार केला. बाजार समिती प्रस्थापित झाल्यानंतर हे सर्व उपबाजार एकत्र एकाच ठिकाणी आणावे म्हणून नागपूर सुधार प्रन्यासकडून जागेची मागणी करण्यांत आली. उपबाजार च्या परिस्थितीचा विचार करुन, त्याचे गांभीर्य लक्षात घेवून नागपूर सुधार प्रन्यासने बाजार समितीला १२६.२५ एकर जागा चिखली (देवस्थान) हया ठिकाणी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले परंतु त्यापैकी ११०.८८ एकर जागेचा ताबा नागपूर सुधार प्रन्यासने बाजार समितीला १९८१ साली दिला. यातील ९.५० एकर जागेच्या रक्कमेचा भरणा मा. जिल्हाधिकारी यांचे कडे करून जागा अधिगृहीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

बाजार समितीला नागपूर सुधार प्रन्यास कडून ११०.८८ एकर जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर सर्व बाजाराची व्यवस्था एकत्र एकाच ठिकाणी करण्याकरीता मे. किर्लोस्कर कन्सलटंट पुणे यांना फिजीबीलीटी रिपोर्ट व झोनल प्लॅन रिपोर्ट सादर करणेकरीता आमंत्रीत केले. झोनल प्लॅन व फिजीबीलीटी रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर बाजार समितीने भारतातील सुप्रसिध्द वास्तू शिल्पकार मे. शिवदानमल मोखा यांचेकडे बांधकामाचा आराखडा तयार करण्याचे काम सोपविले.त्यानंतर बाजार विकासाची कामे व बांधकामाकरीता दोन टप्पे निश्चित करण्यांत आले. बाजार आवारातील बांधकामे टप्प्या–टप्प्याने पुर्ण करुन वर्ष १९८६ मध्ये मिरची गुरे बाजार व संत्रा बाजार, १९८८ मध्ये धान्य बाजार तसेच १९९२ मध्ये कांदा व बटाटा बाजार, २००६ मध्ये ईतवारी येथील धान्य बाजार व दिनांक २४.०८.२०१३ रोजी महात्मा फुले भाजी बाजार व सन २०२० पासुन बकरा मंडी बाजार आवारावर सुरू झालेला आहे.

न्यु कॉटन मार्केट यार्ड येथील जागेवर फूल उत्पादक शेतकऱ्याकरीता समितीच्या अथक प्रयत्नाने फूलबाजार भरविण्याकरीता अद्यावत सुविधाजनक फूलबाजार तयार करावयाचा असून सदर जागेवर समिति अद्यावत व सुसज्ज फूल बाजार भरविण्याकरीता इमारतीचे बांधकाम करणार आहे. सदरील जागा शासनाने समितीला वाटप करण्यास मंजुरी दिली आहे. ही जागा समितीकरीता आरक्षित असुन महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिध्द झाली आहे.

भाजी बाजारालगतची ख.क्र.११४ मधील ४.५ एकर जागा समितीने संपादीत केली असून लगतची शासनाकडून मिळालेली ३ एकर जागा व समितीने संपादीत केलेली २६एकर मिळून एकूण १४४ एकर जागेचा अद्यावत सुविधायुक्त सुधारीत आराखडा नागपूर सुधार प्रन्यासकडे मंजुरीकरीता सादर केला आहे.

या बाजारांत वर्षभरांत ८८०४७७० मॅट्रीक टन कृषि मालाची आवक होते व सरासरी २९२२ कोटी रुपयांची उलाढाल होते. त्यावर बाजार समितीला बाजार फी चे रुपाने २९.२० कोटी रुपये उत्पन्न मिळते. बाजार समितीने स्वत:च्या निधीतून बाजार आवाराची उभारणी करुन विकास कार्याची कामे पुर्ण केलेली आहेत. बाजार समितीवर आजमितीस कोणाचेही कर्ज नाही तसेच शासनाकडुन अनुदान मिळालेले नाही. तसेच नविन धान्य बाजार मध्ये १८६ दुकानाचे बांधकाम करण्यांत आल्यामुळे फक्त १८६ दुकानांचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार वाटप करण्यांत आले. सद्या १०३ दुकानांचे बांधकाम व कॅन्वासिंग एजन्ट ब्लॉक १५८ बांधकाम झाले असून ते सुध्दा उर्वरीत ईतवारी व कॅन्वॉसिंग एजन्ट येथील व्यवसायीकांना वाटप करावयाची आहे. तसेच खसरा क्र ११२ वरती १४ एकर जागेमध्ये प्रस्तावित १४४ दुकाने/गोदाम भाजी बाजाराचे बांधकाम झाले आहे. तेथे लवकरच भाजी बाजार पुर्णपणे सुरू करावयाचा आहे. बाजार आवारातील सर्व सुविधा आणि सेवा समितीच्या स्वत:च्या उत्पन्नातुन समितीने निर्माण केलेले आहेत.

बाजार आवारावर १० चाकी/१६ चाकी ट्रक तसेच ट्रेलर शेतमालाचे आवागमन होत असल्याने समितीने ८० मे.टन वजनाचे संगणकीकरण काटयाचे बांधकाम केलेले आहे व काटा सुरू आहे. धान्य बाजारामध्ये ८० टक्के रोडचे सिमेंट कॉक्रीटीकरण केलेले आहे.

## बाजार आवारातील सोयी सुविधा व सेवा

बाजार आवारात समितीने ३० लिलाव दालने, ३६५ दुकाने व गोदामे, ४९२ अडते/व्यापाऱ्याची कार्यालय, १७० किरकोळ विक्रीची दुकाने, १००० मेट्रीक टन व ३००० मेट्रीक टन क्षमतेची दोन गोदाम, १९.०० लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी आणि जलशुध्दीकरण व पाणी पूरवठा योजना, १६ किलोमिटर लांबीचे डांबरी रस्ते, दुधाळ जनावरांसाठी शेड, प्रसाधन गृहे. शेतकरी निवासामध्ये २०० शेतक—यांना राहण्याची सोय इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

## बाजार समिती चालवित असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रम व स्वरूप

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीने शेतकरी निवासमध्ये शेतकऱ्यांनकरीता रू.५/—मध्ये पोटभर जेवण देण्यांत येत आहे. तसेच आवारावर रूग्णाकरीता ॲम्बुलन्स (रूग्णवाहीका)ची व्यवस्था केलेली आहे.

**बॅंका :—**

बाजार आवारावर सात बॅंकेच्या शाखा उघडण्यांत आलेल्या आहेत. पंजाब नॅशनल बॅंक, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक,नागपूर नागरीक सहकारी बॅंक, सारस्वत बॅंक, जनता सेवा सहकारी बॅंक, वर्धमान सहकारी बॅंक कार्यरत आहेत.

**विद्युत व्यवस्था :—**

बाजार आवारावर समितीने १२५० के.व्ही.ए क्षमतेचे इलेक्ट्रीक सब—स्टेशन स्थापीत केले आहे. तसेच विज पुरवठा खंडीत होवू नये म्हणून एक्सप्रेस फिडरची व्यवस्था केलेली आहे.

बाजार आवारात पोलीस स्टेशन, टेलिफोन एक्सचेंज तसेच पोस्ट ऑफीसची व्यवस्था समितीने स्वत: बांधलेल्या इमारतीत केलेली आहे.

**संगणकीकरण :—**

समितीचे संगणकीकरण सन २००० पासून सुरू झाले आणि सन २००३ पर्यत ३ टप्यात समितीचे अप्लीकेशन सॉफटवेअर तयार केलेले असून समितीच्या प्रशासकीय भवनाशी वायरलेस व ऑप्टीक फायबर केबल व्दारे सर्व उपकार्यालये, आवक गेट, जावक गेट, चिखली गेट तसेच सर्व वेब्रिजेस जोडण्यात आलेले आहेत.

समितीच्या संगणकीकरणामध्ये प्रामुख्याने सर्व बाजाराची सेस वसूली, गुरे बाजार सेस वसुली, विद्युत बिल, पाणी बिल वसुली, गाळे विभाग, लायसंस विभाग, फायनान्स विभाग, इन्व्हेटरी, डेड स्टॉक, कोर्ट केसेस, कर्मचाऱ्यांचे पगार पत्रक, टायपिंग चे सर्व काम संगणकीकृत झालेले आहेत. तसेच मालाची आवक—जावक नोंद संगणकावरच केली जाते. समितीचे आवारातील सर्व वेब्रिजेस संगणकीकृत केले असून एकमेकासोबत जोडलेले असून कुठल्याही वेब्रिजची गाडी कोणत्याही वेब्रिजवर मोजता येते. आणि सर्व संगणकीकृत डाटा समितीचे मुख्य कार्यालय येथील मुख्य सर्वरमध्ये साठविण्यांत येतो. समितीचे ऑनलाईन बिलिंग सॉफ्टवेअर तयार करणे प्रस्तावित आहे.

बाजार समितीचे मराठी व इंग्रजी भाषेतील वेबसाईट www.apmcnagpur.com अद्यावत केलेली आहे. हयामध्ये बाजार समितीचे संपूर्ण माहिती आणि दररोजचे बाजारभाव उपलब्ध आहेत. तसेच दररोजचे बाजारभाव www.msamb.com व्दारे कृषि पणन मंडळ येथे पाठविण्यांत येतात व संपूर्ण राज्याचे बाजारभाव पाहण्याची सोय उपलब्ध आहे. व समितीचे धान्य बाजार आवारात केन्द्र शासनाची ENAM (ईनाम) योजना राबविण्यात येत आहे.

बाजार समितीचे प्रशासकीय भवन, सर्व उपकार्यालय, गेट व काटयावर सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यांत आलेले आहेत. सर्व कॅमेऱ्यांचा सेटअप समितीचे मुख्य कार्यालयात कंट्रोलींगकरीता उपलब्ध आहे. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात समितीचे उत्पन्न वाढण्यास मदत झालेली असुन त्यामुळे बाजार आवाराचे नियंत्रण करणे सोयीचे झाले आहे. बाकी संपुर्ण बाजार आवार व ऑक्शन हॉल मध्ये सी.सी. कॅमेरे लावणे प्रस्तावित आहे.

नव्याने सेस रिसीप्ट बार कोड व्दारा प्रिन्ट करण्यात येत आहे त्यामुळे आउटगेट वरून ऑनलाईन क्लिअरिंग सुरू आहे.

## माती परिक्षण प्रयोगशाळा व शेतकरी माहिती केंद्र

नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीने, इंडियन फारमर्स फर्टिलायझर को—ऑपरेटिव्ह लिमिटेड, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने अद्यावत माती परीक्षण प्रयोगशाळा उभारली आहे. या माती परीक्षण प्रयोगशाळेची इमारत १५.२२ लाख रुपये खर्चून उभारलेली आहे व या प्रयोगशाळेत १० लाख रुपये किमतींची उपकरणे बसविली आहेत. या प्रयोगशाळेचा उद्देश शेतकऱ्यांचे शेतातील माती परीक्षण करुन, मातीचा पी.एच, क्षारता, सेंद्रिय कर्ब, उपलब्ध स्फुरद व पालाश इत्यादी तपासून पिकांना कोणत्या खताचे किती डोजेस द्यावेत या बद्दल सल्ला देण्यांत येत आहे.

वरील प्रकल्प बाजार समिती 'ना नफा ना तोटा' या तत्वावर चालवत आहे. ही सोय नागपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना उपलब्ध आहे. अशा प्रकारचा उपक्रम घेणारी नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, ही महाराष्ट्रातील एकमेव बाजार समिती आहे.

तसेच समितीने शेतकरी निवास येथे शेतकऱ्यांसाठी अद्यावत असे शेतकरी माहिती केंद्र सुरू केलेले असून त्यामध्ये शेती व जोडधंदे इत्यादी विषयावरील जवळपास १५०० पुस्तके उपलब्ध असून, वाचनालयामध्येच प्रोजेक्टर व्दारे विविध शेती विषयावरील सीडीज दाखविण्याची व्यवस्था आहे. तसेच वरील माहिती केंद्रात बाजार समितीतर्फे समितीला भेट देणाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजीत केले जातात व केन्द्र शासनाच्या ENAM (ईनाम) योजनेची असायनिग लॅब (शेतमाल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा) सुरू करण्यात आलेली आहे व गांडुळ खत प्रकल्प सुध्दा सुरू आहे.

## पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र व्यवस्था

बाजार आवारावर महानगरपालिकेकडून आवश्यक तेवढया पाण्याचा पुरवठा होत नसल्यामुळे शासनाच्या भूजल सर्वेक्षण विभागाकडून पाहणी केली असता खाली पाणी नाही असा अहवाल मिळाला. व म्हणून पाण्याची आजची आवश्यकता व भविष्यातील पाण्याची आवश्यकता पुर्ण होण्याकरीता स्वतंत्र पाणीपुरवठा असणे आवश्यक आहे असे समितीला वाटले. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाहणी करण्याचे काम सोपविले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी बाजार समितीचे आवारापासून १७ कि.मी. अंतरावर असलेल्या कन्हान नदीच्या पात्रावर गादा येथे जागेची निवड केली. त्यांनीच या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यांच्याच देखरेखी खाली काम पूर्ण करण्यांत आले आहे. त्याकरीता ६.५० कोटी रुपयाचा खर्च समितीने स्वनिधीतुन केलेला आहे. कन्हान नदीवरुन बाजार समितीपर्यंत पाणी आणण्यांत आले असून पाणी

शुध्दीकरणासाठी इमारत सुसज्ज करण्यांत आलेली आहे. त्यामुळे बाजार आवारावरील पाण्याची समस्या दुर झालेली आहे. तसेच शेतकऱ्यांकरीता शुध्द पाणी उपलब्ध करून देण्याकरीता समितीने धान्य बाजार व संत्रा व फळे बाजार, आलु–कांदा बाजार, मिरची बाजार व भाजी बाजार येथे आर.ओ. वॉटर ए.टी.एम. असे एकुण पाच वॉटर ए.टी.एम सुरू केले आहे.

## –शेतमाल तारण योजना–

शेतकऱ्यांचे मालाला योग्य भाव मिळण्यास शेतमाल साठवणुकीकरीता सदर योजनेअंतर्गत गोदाम उपलब्ध करून देण्यात आलेले असून शेतमालातारण योजना समिती स्वनिधीतून राबवित आहे. त्याकरीता बाजार समिती कडून शेतकऱ्यांना ७५ टक्के अग्रीम रक्कम दिला जातो व सन २०२३–२४ मध्ये रू. ३२.२० लाख अग्रीम शेतकऱ्यांना दिलेला आहे.

**कांदा चाळः–** कांदा उत्पादक शेतकऱ्यांकरीता कांदा चाळ बांधण्यांत आलेली आहे.

**बाजार समितीचे उत्पन्न :–**

समितीचे प्रमुख उत्पन्न बाजार फी चे असून कृषि उत्पादित सर्व शेतमालाचे खरेदीवर खरेदीदारांकडून रुपये १००/– चे खरेदीवर १ रु. बाजार फी कायदेशीर तरतुदीनुसार वसूल करते. तसेच अनुज्ञप्तीधारकाकडून अनुज्ञप्ती फी वसूल करते. मागील ५ वर्षात वसूल झालेली बाजार फी, अनुज्ञप्ती फी, काटा फी तसेच सांक्षांकन फी संबंधिची माहिती पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र | विवरण | आकडेवारी लक्षामध्ये | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१९–२० | २०२०–२१ | २०२१–२२ | २०२२–२३ | २०२३–२४ |
| १ | बाजार फी | २२२७.०८ | २५०८.०० | २६२०.३२ | २८७३.८९ | ३१८७.५५ |
| २ | अनुज्ञप्ती फी | ३.०३ | २.३४ | २.२७ | ३.५८ | २.३० |
| ३ | काटा फी | ३८.२२ | ३५.५५ | ३९.२१ | ६२.२७ | ६७.९४ |
| ४ | सांक्षांकण फी | ०.६४ | २.९८ | ३.४९ | २.९१ | २.०० |
| ५ | एकूण | २२६८.९७ | २५४८.८७ | २६६५.२९ | २९४२.६५ | ३२५९.७९ |

**अनुज्ञप्ती बाबत माहिती :–**

समितीला घोषित शेतमालाच्या नियमनाकरिता खालील अनुज्ञप्ती प्रदान करण्याचे अधिकार असल्याने गेल्या ५ वर्षातील अनुज्ञप्ती धारकांची/व्यावसाईकांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र | अनुज्ञप्तीचा प्रकार | २०१९—२० | २०२०—२१ | २०२१—२२ | २०२२—२३ | २०२३—२४ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्यापारी | १४७४ | १४५९ | १६०२ | १८९९ | ९०६ |
| २ | अडते | ८५६ | ७८५ | ७८५ | ९१९ | १५८९ |
| ३ | दलाल | ७१ | ९३ | १०५ | १०१ | ८२ |
| ४ | हमाल | ४९१ | ४७८ | ३०७ | ३०५ | २५२ |
| ५ | मापारी | २९ | २८ | २७ | २६ | २३ |
| ६ | मदतनिस | १४ | ११ | ११ | १३ | १२ |
| ७ | प्रक्रिया | ७३ | ५७ | ६३ | ५६ | ६२ |
| | एकूण | ३००८ | २९१७ | २९०२ | ३३१९ | २९२४ |

या अगोदर समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २३.०९.२०२२ रोजी संपन्न झालेली आहे.

तसेच समितीचे दिनांक १.४.२०२१ ते ३१.३.२०२३ या कालावधीचे सवैद्यानिक लेखापरिक्षण शासनाचे सहकारी विभाग यांचेकडून लेखापरिक्षणाचे काम सुरू झालेले असून सदर लेखा परिक्षण अहवाल दि. ३०.०५.२०२४ ला प्राप्त झालेला आहे. दोष दुरूस्ती अहवाल पाठविण्यांत आलेला आहे.

बाजार समिती प्रती महाराष्ट्र शासनाची भूमिका कुशल नेतृत्वाची, सहकार्याची व सहानुभूतीची राहीलेली आहे. त्यात प्रामुख्याने मा.ना. श्री. नितिनजी गडकरी (वाहतुक रस्ते दळणवळण मंत्री भारत सरकार) तसेच मा.ना.श्री. एकनाथजी शिंदे (मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य), मा.ना.श्री देवेंद्रजी फडणवीस (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), मा.ना.श्री. अजीत पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), मा.श्री.सुनिलबाबु केदार (माजी मंत्री) यांचे मार्गदर्शनाखाली व नेतृत्वात सदरहु बाजार समितीचे कामकाज चालवण्यास विशेष सहकार्य लाभत असते त्यामुळे त्यांचे जेवढे आभार मानावे तेवढे कमीच आहे. नागपूर जिल्हयातील मा.श्री. श्यामकुमार बर्वे (खासदार, रामटेक लोकसभा), मा.सौ. मुक्तादाई कोकड्डे (अध्यक्षा जि.प., नागपूर), मा. खासदार, मा. आमदार तसेच माजी खासदार, माजी आमदार व स्थानीक संस्थेचे पदाधिकारी हयाशिवाय मा.श्री विकास रसाळ (पणन संचालक, महा.रा. पुणे), मा.श्री. संजय कदम (कार्यकारी संचालक महा.रा. कृषि पणन मंडळ पुणे), मा.श्री. विनायक कोकरे (सरव्यवस्थापक, महा.रा., पुणे) मा.श्री.प्रविण वानखेडे (विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर), श्री. गौतम वालदे (जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर), मा.श्री. अजय कडू (उपसरव्यवस्थापक, महा.रा. कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, नागपूर) यांचे वेळोवेळी कुशल नेतृत्वाखाली अमूल्य सहकार्य लाभले त्यांचा देखील मी आभारी आहे. हयाशिवाय मा. विजयालक्ष्मी प्रसन्ना बिदारी (विभागीय आयुक्त नागपूर), मा.श्री. विपीन ईटनकर (जिल्हाधिकारी, नागपूर) यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले त्यांचादेखिल मी आभारी आहे.

याठिकाणी आर्वजून उल्लेख करावा वाटतो की, या बाजार समितीचे संस्थापक व माजी सभापती सहकार महर्षी स्व.श्री. बाबासाहेब केदार हयांचे प्रेरणेतून हया बाजाराची उभारणी झालेली आहे. तसेच समितीचे माजी सभापती मा. श्री. व्दारकाप्रसादजी कांकाणी यांनी समितीस दिलेल्या योगदानाबद्दल तसेच

त्यांचे नेहमीच आम्हाला मिळत असलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. हयाशिवाय मा. श्री. संजय मीना IAS (सभापती, नागपूर सुधान प्रन्यास) व त्यांचे अधिकारी वर्ग, मा.श्री. अभिजीत चौधरी IAS (प्रशासक नागपूर महानगर पालिका) व त्यांचे अधिकारी वर्ग, मा.डॉ. श्री. रविन्द्र सिघल (पोलिस आयुक्त, नागपूर), व महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अभियंता व त्यांचे अधिकारी हयांनी बाजार समितीच्या अडी अडचणी समजून घेवून समितीला जी मदत केली त्यांचे भरीव सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. बाजार समितीचे अत्याधुनिक अशा बाजार आवारास दरवर्षी सरकारी, निमसरकारी, केन्द्रीय शासनाचे अधिकारी तसेच राज्यातील व राज्याबाहेरील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती व संचालक दरवर्षी भेट देत असतात.

हया बाजार समितीचे निर्मिती करीता व बाजार भरविण्याकरीता नागपूर जिल्हयातील शेतकरी बांधवांनी तसेच नागपूर शहरातील सर्व प्रकारच्या व्यवसायीकांनी जी भरीव मदत केली त्यांचे मदतीशिवाय बाजार स्थानांतरणाची कार्यवाही करणे शक्य झाले नसते अश्या सर्वांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांचे स्मृती देशवासीयांच्या मनात नेहमीकरीता कायम राहाव्यात म्हणून बाजार समितीने विकसीत केलेल्या हया बाजार आवाराचे पं. जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड, नागपूर असे नामकरण सन १९९५ मध्ये केलेले आहे.

आज पं. जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड हा बाजार राज्यातच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये एक प्रमुख नियंत्रीत बाजारपेठ म्हणून नावलौकीकांस आलेला आहे. देशाचे मध्यभागी वसलेल्या नागपूर शहराचे सौंदर्यात त्यामुळे भर पडलेली आहे. दळण वळणाची साधणे, कम्युनिकेशनची व्यवस्था, वाहतुकीकरीता राष्ट्रीय महामार्ग त्यामुळे हया बाजार आवारात  येणारी आवक ही नागपूर जिल्हयातुनच नव्हे तर महाराष्ट्र राज्यातील इतर जिल्हयातुन तसेच राज्याबाहेरुन फार मोठया प्रमाणात बाजार आवारावर होत असते. त्यात प्रामुख्याने आंबा, डाळींब, सफरचंद, द्राक्षे, कांदा—बटाटा, मिरची इत्यादी शेतमालाचा उल्लेख करता येईल तसेच शेतमालाचे विक्रीनंतर येथून परराज्यात व देशाबाहेर माल पाठविला जातो. नागपूर शहरांत कार्गो हब निर्माण होवू घातलेले आहे. व कृषि उत्पादित शेतमालाच्या निर्यातीची व्यवस्था करण्यांत येत आहे त्यामुळे बाजार समितीचे क्षेत्र व त्यामध्ये भरत असलेले बाजार हयास महत्व प्राप्त होणार आहे.

**बांधकाम व जमिनी विषयी माहिती व उपक्रम —**

बाजार समितीचे पं.जवाहरलाल नेहरू बाजार आवार मौजा चिखली देवस्थान येथील समितीकडे १४० एकर जागा असून बाजार आवार विकास विस्ताराकरिता लगतची खसरा क्र ९४ मधील ९.५६ एकर जागा संपादीत करण्यात आली असून खसरा क्र ११४/१ मधील १.७२ एकर व खसरा क्र ११४/२—३ ख मधील १.६२ हेक्टर जागा संपादनाची कार्यवाही सुरू आहे.

न्यु कॉटन मार्केट यार्ड गणेशपेठ येथे ३ एकर जागेत अद्यावत आंतरराष्ट्रीय दर्जाचे वातानुकुलीत फूल मार्केट उभारणेकरीता प्रस्तावीत आहे. नागपूर सूधार प्रन्यास व कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये वाटाघाटी सूरू आहे.

समितीचे उपबाजार बुटीबोरी येथील खसरा क्र १२८ येथे भाजी/गोडावून लिलाव दालन उभारण्याचा कामास रू. १,८६,४३,०१२/— रकमेच काम प्रस्तावीत आहे. शासनाकडून कामाची मंजूरी प्राप्त झालेली आहे लवकरच काम सुरू होईल.

समितीचे पं.जवारहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये सी.सी रोड,डांबरीकरण,नविन भाजी बाजार डी. आय.पाईप लाईन या सर्व कामाची मंजूरी मा.पणन संचालक, म.रा.पूणे यांचेकडून प्राप्त आहे त्या सर्व कामची किंमत रू. ७५,०३,११,९६०/— चे आहे सर्व कामाची लवकरच सुरूवात करण्यात येईल.

भाजी बाजारातील १४६ गाळयांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. लवकरच गाळे वाटप होउन नविन जागेवर भाजी बाजार स्थानांतरीत करण्यात येईल.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड येथील आलू कांदा बाजार,संत्रा व फळे बाजार, धान्य बाजार,मिरची मार्केट व न्यू ग्रेन मार्केट पे ॲण्ड यूज शौचालयाचे काम रू. २,४७,९०,४४०/— चे आहे. लवकरच सर्व बांधकाम सुरू करण्यात येत आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड येथिल शेतकरी भवन मधील तळ मजल्याचे नुतनीकरण रू. ८३,८२,२७४/— चे कामाचे शासकीय मंजूरी प्राप्त झालेली आहे. लवकरच काम सुरू करण्यात येत आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड न्यू ग्रेन मार्केट,आलू कांदा बाजार,संत्रा व फळे बाजार, धान्य बाजार,मिरची बाजार व भाजी बाजार निहाय देखभाल/दुरूस्ती रू.४,७२,८३,२६७/— चे कामाची शासनाकडून मंजूरी प्राप्त झाली आहे. लवकरच काम सुरू करण्यात येईल.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड येथिल सिव्हर व स्ट्रॉम वाटर पाईप लाईन प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून प्राप्त प्रकल्प अहवाल रू.१५,१४,६७,९२७/— चे काम प्रस्तावीत आहे. अहवाल मंजूरीकरीता शासनाकडे पाठविला आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये शेतकरी, हमाल, अडते यांचे करीता ४ थंड पाणीचे आर.ओ प्लॉन्ट वाटर ए.टि.एम सुरू आहे आणि १ आर.ओ प्लान्ट ए.टि.एम. प्रस्तावीत आहे.

समितीचे पं.जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये संपूर्ण मार्केट मधिल लिलाव दालनातील जुन्या ए. सी. शिट काढून नविन प्रोफाईन शिट लावण्याचे काम सुरू आहे.

विद्युत व पाणी विभाग विषयी माहिती उपक्रम :—

समितीचे पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड मध्ये विद्युत व्यवस्था सुरक्षित ठेवण्याचे दृष्टीने ग्रीड केबल नेटवर्कच्या नुतणीकरणाचे काम झालेले आहे. अस्तित्वात असलेले सर्व पथदिवे/फ्लडलाईट्स उर्जा कार्यक्षम अत्याधिक स्मार्ट एल.ए.डी पथदिवे/फ्लडलाईट्सने बदलविणे इमारती व ऑक्शन हॉल मधील जुने विद्युत पॅनल काढुन नविन एम.सी.सी.बी पॅनल लावणे व संपूर्ण बाजार आवारात ९५० के.व्ही. क्षमतेचा सोलर प्रकल्प प्रस्तावित आहे.

गादा ते पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड ,कळमना पर्यंत २५० एम.एम. व्यासची १५ किमी.नविन डी.आय. पाईप टाकण्यात आली आहे.

नागपूर तालुक्यातील ग्रामपंचायती, सेवा सहकारी संस्था चे पदाधिकारी व सदस्य, व्यापारी व अडते आणि हमाल वर्गाचे तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे हे घडू शकले त्या सर्वांचे आभार मानतो.

आपण करीत असलेल्या सहकार्याबद्दल मी आपणां सर्वांचे आभार माणून हा अहवाल संपवितो.

संचालक मंडळाच्या वतीने

| | | |
|---|---|---|
| एन.पी. यगलेवाड | प्रकाश राधाकिसनजी नागपूरे | अहमदभाई करीमभाई शेख |
| अपर निबंधक तथा सचिव | उपसभापती | सभापती, |

व सर्व संचालक मंडळ,

विषय क्र.३: सन २०२३–२४ च्या ताळेबंद पत्रकाची माहिती देणे.

## कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

पं. जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड, नागपूर - ३५

### दिनांक १/४/२०२३ ते ३१/३/२०२४ कालावधी आय-व्यय विवरण पत्रक

| अ.क्र. | व्यवयाचे विवरण | रक्कम रूपये | अ.क्र. | आयचे विवरण | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | सभापती/उपसभापती मानधन | १७५०००.०० | १ | बाजार फी | ३१८७५४८५२.२३ |
| २ | सभासद उपस्थिती भत्ता | ५१७५०.०० | २ | गांडुळ खत विक्री | ५७९८०.०० |
| ३ | सभासद प्रवास भत्ता | ११००५.०० | ३ | किरकोळ दंड | १९२४५५.५० |
| ४ | सभासद दैनिक भत्ता | ८२८००.०० | ४ | इतर उत्पन्न | ४०२२२८७८.८८ |
| ५ | सभा खर्च | ३७८२४.०० | ५ | विद्युत बिल वसुली | १८०१५४८२.८५ |
| ६ | अधिकारी/कर्मचारी वेतन | ३०४८४३२३.०० | ६ | पाणी बिल वसुली | ६३१८७२.१८ |
| ७ | अधिकारी/कर्मचारी महागाई भत्ता | १३६८७५५३.०० | ७ | कॅन्टीन पानठेले ऑक्शन चार्जेस | ४२५५४९८.०० |
| ८ | अधिकारी/कर्मचारी वाहन भत्ता | १७३९०२२.०० | ८ | गुरे साक्षांकण फी | १९९९६०.०० |
| ९ | अधिकारी/कर्मचारी उपदान खर्च | ३१५८६९६०.०० | ९ | गुरे गेटपास फी | ६५६९८४.०० |
| १० | अस्थाई कर्मचारी वेतन | १४४७५३६१.९८ | १० | गुरे शेड भाडे | १०५००.०० |
| ११ | अधिकारी/कर्मचारी विशेष भत्ता | ३२३७१.०० | ११ | काटा फी | ६७९४४४५.०० |
| १२ | अधिकारी/कर्मचारी घरभाडे भत्ता | ५३९८५८६.०० | १२ | वॉटर ऐ.टी.एम. | १९७१५०.०० |
| १३ | अधिकारी/कर्मचारी भ.नि.निधी खर्च | ६९४८७९५.०० | १३ | सेव्हिंग अधिकोष व्याज | ३२९७९४०.०० |
| १४ | कर्मचारी राज्य विमा निगम | १८३४१८.०० | १४ | गुंतवणुकीवरील व्याज | १३७६०६३५६.२५ |
| १५ | अधिकारी/कर्मचारी वैद्यकिय भत्ता | ४०६१२५.८१ | १५ | अनुज्ञप्ती फी | २३०००७.०० |
| १६ | अधिकारी/कर्मचारी प्रवास भत्ता | १७९७९.८० | १६ | अनुज्ञप्ती विलंब शुल्क | २०४९८४.०० |
| १७ | अधिकारी/कर्मचारी अर्जीत रजा वेतन | ९९५४००.०० | १७ | अनुज्ञप्ती दुय्यम प्रत फी | ४६१६.०० |
| १८ | अधिकारी/कर्मचारी शहरी पुरक भत्ता | १६१३७७.०० | १८ | बाजार ऑफीस भाडे | १६२००.०० |
| १९ | अधिकारी/कर्मचारी थकीत वेतन | ३२९१४४२.०० | १९ | गोदाम भाडे | २७५१४२९.०० |
| २० | अधिकारी/कर्मचारी पोशाख व धुलाई | ५६९८.०० | २० | शेतकरी निवास भाडे | ५४३०८०.०० |
| २१ | अधिकारी/कर्मचारी सानुग्रह | ३०६६१३६.०० | २१ | बाजार आवार भाडे | १२४१९५.०० |
| २२ | अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्ती भत्ता | ८९९२०.०० | २२ | छापिल साहित्य विक्री | ५५१५८.०० |
| २३ | अधिकारी/कर्मचारी दैनिक भत्ता | ११६६३.०० | २३ | | |
| २४ | झेरॉक्स खर्च | ४६५९.०० | २४ | | |
| २५ | महा. राज्य कृषि पणन मंडळ अंशदान खर्च | २३८२९८५२.३० | २५ | | |
| २६ | महा. राज्य बाजार समिती संघ वर्गणी खर्च | २५०००.०० | २६ | | |
| २७ | निवडणुक खर्च | १०००००.०० | २७ | | |
| २८ | अवक्षयण खर्च | ४८५८९९६७.७८ | २८ | | |
| २९ | अविक्रय माल दुरूस्ती | ३५६४८५१.०० | | | |
| ३० | वृक्षारोपन व संवर्धन | १७७८२५०.०० | | | |
| ३१ | जाहीरात व प्रचार | २९६२५२०.०० | | | |
| ३२ | भेटी व समारंभ | २६२७९४१.०० | | | |
| ३३ | विधीविषयक खर्च | ५६९५१७६.०० | | | |
| ३४ | अंतर्गत/शासकीय अंकेक्षण शुल्क खर्च | १६५४६८६.०० | | | |
| ३५ | कन्सलटन्सी चार्जेस | १५१७४०५६.०० | | | |
| ३६ | बँक चार्जेस | २६५२७२.९८ | | | |

| अ.क्र. | व्यवयाचे विवरण | रक्कम रूपये | अ.क्र. | आयचे विवरण | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | कार्यालयीन लेखन साहित्य खर्च | ५६३३२६.४४ | | | |
| ३८ | टेलिफोन व तार | ३२३१३२.८० | | | |
| ३९ | कर्मचारी पोषाख खरेदी | ६९४९९.०० | | | |
| ४० | वर्तमान पत्रे व नियकालीके | २३३६५.०० | | | |
| ४१ | ऑफीस छपाई खर्च | १५५६२२२.०८ | | | |
| ४२ | वाहन भाडे | ६४२६९६.९६ | | | |
| ४३ | मुख्य बाजार देखभाल व संरक्षण | ४०१९९५६८.०० | | | |
| ४४ | मुख्य बाजार सिव्हील कामे देखभाल | १६३३८३७४.५३ | | | |
| ४५ | मुख्य बाजार साफसफाई | १३७७५५३५.०० | | | |
| ४६ | मुख्य बाजार विद्युत कामे देखभाल | ११७८२७१८.६८ | | | |
| ४७ | पाणी पुरवठा योजना देखभाल खर्च | १९२९५१०.०० | | | |
| ४८ | जागा लिझ भाडे | ३९२५१६.०० | | | |
| ४९ | डाक व तार | ७०००.०० | | | |
| ५० | राजस्व मुद्रांक | २८००.०० | | | |
| ५१ | उपबाजार देखभाल व संरक्षण | ३४०२२९९.०० | | | |
| ५२ | उपबाजार साफसफाई | ६६२५०.०० | | | |
| ५३ | उपबाजार सिव्हील कामे देखभाल | २५५४०२.०० | | | |
| ५४ | उपबाजार विद्युत कामे देखभाल | १३८८७.०० | | | |
| ५५ | विद्युत बिल खर्च | ३४९६६७००.०० | | | |
| ५६ | अकृषक कर | ११९२६६.०० | | | |
| ५७ | आयकर आणि इतर कर | १८१४१३४.०६ | | | |
| ५८ | पाणी बिल खर्च | १३१६९५.०० | | | |
| ५९ | महानगरपालीका/ग्रामपंचायत कर | ५३०८८४४.०० | | | |
| ६० | वाहन इंधन | ९७०६९५.४४ | | | |
| ६१ | वाहन दुरूस्ती | ५०२४५५.०० | | | |
| ६२ | वाहन विमा | ४२४९३.०० | | | |
| | **आयचे व्ययावरील आधिक्य** | १८०२८५९०६.२५ | | | |
| | **एकूण** | ५३४८२४०२३.८९ | | **एकूण** | ५३४८२४०२३.८९ |

मुख्य लेखाधिकारी
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

अपर निबंधक तथा सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

# कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

## ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२४ रोजी संपणाऱ्या वर्षाचे

## ताळेबंद पत्रक (नमुना एन)

| रक्कम ३१ मार्च २०२३ | देयता | परी क्र. | रक्कम ३१ मार्च २०२४ | रक्कम ३१ मार्च २०२३ | संपत्ती | परी क्र. | रक्कम ३१ मार्च २०२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2,74,19,48,701.62 | संचीत वाढावा | १ | 2,92,22,34,607.87 | | हस्तस्थ रोख आणि अधिकोषस्थ रोख | | |
| | | | | 39,56,831.40 | हस्तस्थ रोख | | 47,00,087,00 |
| 45,78,722.00 | शासकीय अनुदान | २ | --- | 10,06,11,830.05 | अधिकोषस्थ रोख | ६ | 9,49,31,155.47 |
| 85,09,21,723.40 | निधी | ३ | 85,67,13,305.90 | 1,37,09,68,992.10 | कायम जिंदगी व स्थावर मालमत्ता | ७ | 2,06,11,11,488.10 |
| 3,37,76,289.01 | अग्रीम आणि ठेवी | ४ | 3,52,28,272.76 | 2,17,01,12,047.00 | गुंतवणूक | ८ | 1,69,42,86,234.00 |
| 6,16,81,945.15 | शासकीय आणि इतर देणी | ५ | 6,01,67,520.23 | | चालु (फिरती) मालमत्ता कर्ज व अग्रिम | | |
| | | | | 21,72,221.62 | I) संवरण स्कंध | ९ | 26,25,358.59 |
| | | | | 4,50,85,459.01 | II) कर्ज व अग्रिम | १० | 1,66,89,383.60 |
| 3,69,29,07,381.18 | एकूण | | 3,87,43,43,706.76 | 3,69,29,07,381.18 | एकूण | | 3,87,43,43,706.76 |

मुख्य लेखाधिकारी
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

<u>विषय क्र.४</u> :– सन २०२४–२५ चे आर्थिक अंदाजपत्रक माहितीस्तव सादर.

## कार्यालय, नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, नागपूर

### सन २०२४–२५ चा मूळ अर्थसंकल्प

बाजार समितीचा वर्ग अ

| अ. क्र. | मुख्य | जमा | | अ. क्र. | मुख्य | खर्च | | एकुण उत्पन्नाशी खर्चाची टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण उत्पन्न रु. | एकुण उत्पन्नाची टक्केवारी (%) | | | एकुण खर्च | एकुण खर्चाची टक्केवारी (%) | |
| अ | अ फी (शुल्क) | 298111164 | 58.77% | ख | ख सभा व भत्ता | 438000 | 0.11% | 0.09% |
| ब | ब इतर उत्पन्न | 28390000 | 5.60% | ग | ग आस्थापना खर्च | 99817500 | 24.47% | 19.68% |
| क | क गुंतवणूक उत्पन्न / भांडवली उत्पन्न | 180780000 | 35.64% | घ | घ प्रशासकीय खर्च | 145275000 | 35.62% | 28.64% |
| ड | ड अनुदान | | | च | च मुख्य दुय्यम बाजार आवार | 84840000 | 20.80% | 16.72% |
| इ | इ कर्ज | | | छ | छ व्याज | | | |
| | अ+ब+क | 507281164 | 100.00% | ज | ज कर्ज परतफेड (व्याज सोडून) | | | |
| | एकुण रु. | 507281164 | 100.00% | त | त भांडवली खर्च | 77502000 | 19.00% | 15.28% |
| | सुरवातीची रोख शिल्लक | | | | ख+ग+घ+च+छ | 330370500 | 81.00% | 65.13% |
| | सुरवातीची बँक शिल्लक | -428900465 | | | एकुण रु. | 407872500 | 100.00% | 80.40% |
| | एकुण रु. | -428900465 | | | अखेरची रोख शिल्लक | | | |
| | एकुण बेरीज रु. | 78380699 | | | अखेरची बँक शिल्लक | -329491801 | | |
| | | | | | एकुण रु. | -329491801 | | |
| | | | | | एकुण बेरीज रु. | 78380699 | | |

| आस्थापना | अनुदान | एकुन आस्थापना |
|---|---|---|
| 95817500 | 4000000 | 99817500 |
| 18.89% | 0.79% | 19.68% |

मुख्य लेखाधिकारी
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती
नागपूर

विषय क्र.५ :— मा. विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) सहकारी संस्था, नागपूर यांनी सादर केलेला वर्ष २०२२—२३ च्या लेखा परिक्षणाचा अहवाल माहितीस्तव सादर.


-: महाराष्ट्र शासन :-

सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालय,

प्रशासकीय इमारत क्र. २, आठवा माळा, विंग - बी, जिल्हा परिषद समोर, नागपूर ४४०००१

दूरध्वनी क्र. ०७१२-२५२८२३३

Email :- djradt_ngp@rediffmail.com


---

जा.क्र.विसनि(लेप)/अंके-३/कृउबास नागपूर/लेपअह/२०२२-२३/४५९/२४ दिनांक : ३०/०५/२०२४

प्रति,

सभापती / सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर
ता. जिल्हा- नागपूर.

**विषय** :- सन २०२२-२३ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणेबाबत..

उपरोक्त विषयानुसार कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर चे सन २०२२-२३ ( दि. ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आले असुन सदर कालावधीचा वैधनीक लेखापरीक्षण अहवाल यासोबत सादर करण्यात येत आहे.

अंकेक्षण अहवालात दर्शविलेल्या भाग अ, ब व क मधिल सर्व दोषाची पुर्तता करुन त्याबाबतचा दोषदुरुस्ती अहवाल तीन प्रतीत 'ओ' नमुन्यात संचालक मंडळाच्या ठरावासह अंकेक्षण अहवाल मिळाल्यापासुन तीन महिन्याच्या आत या कार्यालयास सादर करावा.

पान क्र.- १ ते 928

( आर. डी. बिर्ले )
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था
(लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर

प्रतिलीपी :-

१) मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, नागपूर.
४) सरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, कृषी पणन मंडळ, पुणे.

( आर. डी. बिर्ले )
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था
(लेखापरीक्षण) नागपूर विभाग नागपूर